# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक २४/०४/२०२२ (रविवार)

---

## घरफोडी

**पोलीस स्टेशन सावनेर** – अंतर्गत गायकी लेआट ०१ कि मी पुर्वे. यातील फिर्यादी हे आपले परीवारासह देवदर्शनाकामी शेगाव येथे गेले असता कोणीतरी अज्ञात इसमाने दि २१/०४/२२ चे १७/०० वा. ते २३/०४/२२ चे १०/३० वा दरम्यान, फिर्यादी यांच्या राहते घराचे समोरील दाराचे लॉक तोडुन आत प्रवेश करून घरातील बेडरूम मध्ये असलेल्या कपाटातील पर्स मधील रोख रक्कम ६७,००० /–रूपये चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अक्षय प्रंशात डवले वय ३५ वर्षे रा गायकी ले–आउट सावनेर यांचे रिपोर्टवरून पोस्टे सावनेर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ४५४, ४५७, ३८० भा.द.वी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक नागवे पो.स्टे. सावनेर हे करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन कुही** – अंतर्गत कुही बसस्टॉप समोर १ किमी दक्षीण. दिनांक ०२/०४/२२ चे रात्री ०८/०० वा दरम्यान यातील मृतक – वैभव विठठ्लराव देशमुख वय २२ वर्ष रा कुही हा कुही बसस्टॉप समोर आपले मोटर सायकल उभी ठेवुन त्यावर वर आपले मित्र जखमी नामे–१) प्रणय अतुल बोंदरे वय १५ वर्ष २) मयुर दशरथ तितरमारे वय १५ वर्ष दोन्ही रा कुही सह बोलत असता, यातील आरोपी याने आपले ताब्यातील पल्सर वाहन क्र एम–एच ४० यु ८३९० हे भरधाव वेगाने व निष्का्ळजीणे चालवुन मृतकचे मोटर सायकल ला मागुन धडक दिल्याने मृतकचे डोक्याला मार लागला, तसेच सोबत असलेल्या मित्राला सुध्दा जखमी केले. मृतकला प्रथम उपचाराकरीता ग्रामीण रूग्यालय कुही येथे नेले असता, तेथुन त्याला नागपुर येथे रेफर केल्याने. दिनांक ०५/०४/२२ वा उपचारा दरम्यान मरण पावला. सदर चे कागदपत्रे प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे पोना ग्याणीवंत गुरपुडे पोस्टे कुही यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कुही येथे आरोपी नामे– अभय बलीराम बिलोने वय २२ वर्ष रा डोगरगाव ता वाराशिवनी जि.बालाघाट यांचे विरूध्द कलम २७९,३३७,३३८,३०४ (अ) भादवी सहकलम १८४ मोवाका प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास पोलीस उपनीरीक्षक देविदास ठमके पोस्टे कुही मो क्र ८७८८५५३१३९ हे करीत आहेत.

## मोटर सायकल चोरी

**पोलीस स्टेशन मौदा** – अंतर्गत कढोली १५ किमी प, दिनांक २३/०४/२२ चे ०८.०० ते ०९.०० वा. दरम्यानय, यातील फिर्यादीने त्याची पल्सर मोटर सायकल गाडी क्र एमएच– ३१.एफएच ०५०२ कि. ३५,०००/–ची नेहमीप्रमाणे दुधे पेट्रोलपंप येथे ठेवुन आपले कामावर गेले असता, कामावरून परत आल्यावर मोटर सायकल दिसुन आली नाही.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सूमित बंडूजी ढोके वय २७ वर्ष रा वडोदा ता कामठी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भा.द.वी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, पुढील तपास पो ना देवेन्द्र भूरे मो क्र ७७२२००३३४२ हे करीत आहेत.

## विहीरीत उडी घेवुन आत्महत्या.

**पोलीस स्टेशन रामटेक :–** अंतर्गत दिनांक २३/४/२२ चे ०१/०० वा. ते ०२/०० वा. दरम्यान, यातील मृतक नामे– श्रीमती ईदुमती रामचंद्र वाघमारे वय ७८ वर्ष रा. राधाकृष्ण वार्ड रामटेक हि वयोवृध्द असुन वयोवृध्द पणाच्या त्रासाला कंटाळुन घरासमोरील विहीरीत उडी घेउन पाण्यात बुडुन मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो स्टे रामटेक येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ/सदाशिव काठे पोस्टे रामटेक मो.न. ९०११३२६७९३ करीत आहेत.

## विषारी औषण प्राशन करून मृत्यु.

**पोलीस स्टेशन जलालखेडा :–** अंतर्गत मौजा करजोली ९ किमी पुर्व. दिनांक २१/०४/२०२२ चे १२.३० वा. दरम्यान. यातील मृतक– रामदास रायभान काळबांडे वय ५२ रा करजोली ता.नरखेड यांने अज्ञात कारणावरून कोणतेतरी विषारी औषध सेवन केल्याने प्रथम उपचाराकरीता प्राथमीक आरोग्य केद्र जलालखेडा येथे नेले असता तेथुन रेफर केल्याने मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता, उपचारादरम्यान मरण पावल्याचे कागदपत्र प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे – हेमंत रामदास काळबांडे वय ५२ वर्ष रा करजोली ता.नरखेड यांचे रिपोर्टवरून पो स्टे जलालखेडा येथे कलम १७४ जाफौ चा मर्ग दाखल करण्यात आला असुन, सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ/ अनिल जोशी ९६७३०१८८०७ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**